भूमी अभिलेख कक्षातील ३३ पदे चालू ठेवण्याबाबत चालू बाब प्रस्ताव सन २०१९-२०.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१९/प्र.क्र.१८६/फ-३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ८ मार्च, २०१९.

पहा :-

१) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्रमांक एस-१०/२०१८/प्र.क्र.१८६/फ-३, दिनांक १४.०३.२०१८ व दिनांक २७.०९.२०१८.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-३/योजनेत्तर/प्र.क्र.२१/१८-१९/२१४१; दिनांक २६.०२.२०१९.

३) वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २१.०२.२०१९

शासन निर्णय :

भूमी अभिलेख कक्षातील ३३ अस्थायी पदे दिनांक २८.२.२०१९ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाने संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये यापूर्वी मान्यता दिली होती. सदर ३३ अस्थायी पदे आता दिनांक २९.०२.२०२० पर्यंत चालू ठेवण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्ताव सादर केला आहे.

वित्त विभागाच्या दिनांक २१.०२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या अधिनस्त सर्व अस्थायी पदांना दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार देण्यात आले आहे. यास्तव **प्रपत्र-अ** मध्ये दर्शविल्यानुसार सदर ३३ अस्थायी पदे **दिनांक १.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत** चालू ठेवण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) सदर ३३ अस्थायी पदे ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी रिक्त नाहीत.

ब) सदर ३३ अस्थायी पदे भूमी अभिलेख कार्यालयातील असून ती वन विभागातील पदांच्या आढाव्या अंती मान्य केलेल्या आकृतीबंधातील २५०२५ पदांमध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे.

२. या अन्वये होणारा खर्च हा २४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेत्तर), ०१ वनीकरण, १०१ वनसंधारण व विकास, १०१ (दोन) वनाचे सर्वेक्षण, जमाबंदी व सिमांकन (२४०६ ०१०२) या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वित्तीय वर्षातील मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाचे क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २१.०२.२०१९ च्या शासन निर्णयास अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०८१४२२३१९६१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Sunil Pandurang Pandhare

Digitally signed by Sunil Pandurang Pandhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7f874792415b92ba519384cacb41b53a89cf93dbd96d4be1f7d97fb6326eed47, cn=Sunil Pandurang Pandhare
Date: 2019.03.08 14:25:33 +05'30'

(सुनिल पांढरे)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे / नागपूर.
५. मुख्य वनसंरक्षक, भूमी अभिलेख कक्ष, प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचे कार्यालय.
६. उप वनसंरक्षक, भूमी अभिलेख कक्ष, नागपूर.
७. उप वनसंरक्षक, भूमी अभिलेख कक्ष, ठाणे स्थित पनवेल.
८. महालेखापाल-१ (लेखा परिक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. महालेखापाल-२ (लेखा परिक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर / ठाणे.
११. वित्त विभाग, व्यय-१०, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२. ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१३. फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१४. निवडनस्ती, फ-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

प्रपत्र-अ

अ. क्र	पदनाम	प्र.मु.व.सं.म.रा. नागपूर यांचे कार्यालयात मु.व.सं.भूमी अभिलेख कार्यालयातील पदे	अ.प्र.मु.व.सं. (वन्यजीव) पुर्व नागपूर कार्यालयातील पदे	उप वनसंरक्षक, भूमी अभिलेख पुर्व प्रदेश नागपूर कार्यालयातील पदे	उप वनसंरक्षक, भूमी अभिलेख पश्चिम प्रदेश कार्यालय ठाणे स्थित पनवेल कार्यालयातील पदे	एकूण
१	मुख्य वनसंरक्षक	१	०	०	०	१
२	उप वनसंरक्षक	०	०	१	१	२
३	उप संचालक, भूमी अभिलेख	१	०	०	०	१
४	विभागीय वनअधिकारी	१	०	०	०	१
५	उप अधिक्षक, भूमी अभिलेख	१	०	१	१	३
६	कार्यालय अधिक्षक	१	०	०	०	१
७	लघुलेखक (उच्चश्रेणी)	१	०	०	०	१
८	लघुलेखक (निम्म श्रेणी)	०	०	१	१	२
९	मुख्य लेखापाल	१	१	०	१	३
१०	लेखापाल	१	०	१	१	३
११	निमतनदार	२	०	१	१	४
१२	लिपीक	२	०	२	२	६
१३	वाहन चालक	१	०	१	१	३
१४	शिपाई	०	०	१	१	२
एकूण पदे		**१३**	**१**	**९**	**१०**	**३३**

*****